# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk2a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक:२अ/एडीएम/प्रवेश/२०१६/१२०५
दिनांक : 22 SEP 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

विषय:- जात वैधता प्रमाणपत्राअभावी अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेशा पासून वंचित न ठेवण्याबाबत.

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. ६३/२०१४ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिनांक २४.१२.२०१४ रोजी खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

**However,it is made clear that this order would operate only in the cases of the students whose claims are pending before the Caste Scrutiny Committee and not yet decided. It is further made clear that it will not be applicable to such of the students whose claims are invalidated, unless they are stayed by the competent Court of law.** (आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.)

या संदर्भात शासनाने दि. १९.०१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये व्यावसायिक अभ्यासक्रमाबाबतची अनुसुचित जमातीच्या (ST) उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही त्यांना प्रवेशापासुन वंचित ठेवू नये असे कळविले होते.

शासनाने दिनांक १९.०१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेले आदेश आणि जनहित याचिका ६३/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेता जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडुन दाव्याची वैधता निश्चित झालेली नसणे किंवा समितीकडे दावा प्रलंबित आहे अशा उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्राअभावी प्रवेशापासून व इतर लाभापासून वंचित ठेवण्यात येऊ नये असे आपल्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात यावे.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रत : प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव यांना त्यांचे पत्र क्रमांक शाअमज/विवि/२०१६/१८९८, दि. ०६.०८.२०१६ च्या अनुषंगाने माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

---

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2016/ 2710
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- 26 SEP 2016

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्यासक्रम,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार जात वैधता प्रमाणपत्राअभावी अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित न ठेवण्याबाबत कार्यवाही करावी.

(पुलोबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर